# महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल
# सन 2016-2017

## प्रकरण एक
## सर्वसाधारण

### 1.1 लेखापरीक्षण केलेल्या संस्था

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांचे विधीमान्य लेखापरीक्षक असून ते मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 च्या उपबंधानुसार जिल्हा परिषदांच्या व पंचायत समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करतात. एकूण 34 जिल्हा परिषदांचे व 351 पंचायत समित्यांचे सन 2016-2017 या वर्षाचे लेखापरीक्षण पुर्ण करण्यात आले आहे.

### 1.2 अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष रकमा

सन 2016-2017 मधील अर्थसंकल्पीय अंदाज, प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व महसूली खर्च सन 2015-2016 या वर्षाच्या संबंधीत आकडयांसह खाली दिला आहे.

**(रुपये कोटीमध्ये)**

| वर्ष | अर्थसंकल्प रकमा | | | | प्रत्यक्ष रकमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शासकीय | अभिकरण | जिल्हा परिषद | एकूण | शासकीय | अभिकरण | जिल्हा परिषद | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| **महसूली जमा** | | | | | | | | |
| 2015-2016 | 28711.20 | 2196.81 | 1274.05 | 32182.06 | 28962.72 | 2271.61 | 1310.30 | 32544.63 |
| 2016-2017 | 29270.56 | 2201.28 | 1256.28 | 32728.12 | 28990.88 | 2220.46 | 1345.19 | 32556.53 |
| **महसूलातून भागविलेला खर्च** | | | | | | | | |
| 2015-2016 | 28613.52 | 2380.72 | 1772.52 | 32766.76 | 26750.12 | 2048.84 | 1426.17 | 30225.13 |
| 2016-2017 | 30438.51 | 2326.76 | 1372.17 | 34137.44 | 28050.76 | 2224.67 | 1177.14 | 31452.57 |

1) सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये शासकीय निधी अंतर्गत जिल्हा परिषदांना रक्कम रुपये 28990.88 कोटी अनुदान उपलब्ध झाले असुन उपलब्ध अनुदानाचे अधिन जिल्हा परिषदांनी रक्कम रुपये 28050.76 कोटी खर्च नोंदविला आहे. सदर खर्चाची टक्केवारी 96.76% आहे.

2) सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये अभिकरण निधी अंतर्गत रक्कम रुपये 2220.46 कोटी अनुदान व खर्च रक्कम रुपये 2224.67 खर्च नोंदविला आहे. खर्चाची टक्केवारी 100.19% आहे.

3) जिल्हा परिषद निधी प्राप्त अनुदान रक्कम रुपये 1345.19 कोटी व खर्च रक्कम रुपये 1177.14 कोटी नोंदविला आहे. खर्चाची टक्केवारी 87.50 % कोटी आहे.

## 1.3 महसुली जमा रकमा

जिल्हा परिषदेच्या सन 2015-2016 मधील महसुली जमा रकमांचा व चालु वर्ष 2016-2017 मधील महसुली जमा रकमांचा निधी निहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे

**(रुपये कोटीत)**

| अ.क्र | तपशिल | जमा रकमा | | फरक | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2015-2016 | 2016-2017 | रक्कम | टक्केवारी |
| 1 | शासकीय निधी | 28962.72 | 28990.88 | 28.16 | 0.10% |
| 2 | अभिकरण निधी | 2271.61 | 2220.46 | (-)51.15 | (-) 2.25% |
| 3 | जिल्हा परिषद स्वउत्पन्न | 1310.30 | 1345.19 | 34.89 | 2.66% |
| | एकूण | 32544.63 | 32556.53 | 11.9 | 0.04% |

सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील शासकीय निधी प्राप्त अनुदानाचे अधिन जमा रक्कम रुपये 28,990.88 ची तुलना सन 2015-2016 या वित्तीय वर्षाशी केली असता 28.16 ची वाढ झालेली असुन 0.10 टक्के नी वाढ झालेली आहे. अभिकरण निधी प्राप्त अनुदान रूपये 2220.46 ची तुलना 2015-2016 या वर्षातील अनुदानाशी केली असता (-) 51.15 म्हणजे (-)2.25 टक्के घट दिसुन येते. तसेच जिल्हा परिषद स्वउत्पन्नाच्या बाबतीत रूपये 1,345.19 ची तुलना 2015-2016 शी केली असता 34.89 म्हणजे 2.66 टक्के वाढ दिसुन येते.

## 1.4 महसुली लेख्यांवरील खर्च

सन 2016-2017(रुपये 31452.57 कोटी) या वर्षाच्या महसुली खर्चात सन 2015-2016 (रुपये 30225.13 कोटी) च्या तुलनेने(+) 1227.44 म्हणजे 4.06 टक्के वाढ झाल्याचे आढळून आले आहे. त्याचा निधीनिहाय तपशिल खालीलप्रमाणे.

**(रुपये कोटीत)**

| अ.क्र | तपशिल | खर्च | | फरक | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2015-2016 | 2016-2017 | रक्कम | टक्केवारी |
| 1 | शासकीय निधी | 26750.12 | 28050.76 | 1300.64 | 4.86% |
| 2 | अभिकरण निधी | 2048.84 | 2224.67 | 175.83 | 8.58% |
| 3 | जिल्हा परिषद स्वउत्पन्न | 1426.17 | 1177.24 | (-)248.93 | (-)17.45% |
| | एकूण | 30225.13 | 31452.57 | 1227.44 | 4.06% |

सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील शासकीय निधी प्राप्त अनुदानाचे अधिन झालेला खर्च रक्कम रुपये 28050.76 ची तुलना सन 2015-2016 या वित्तीय वर्षाशी केली असता 1300.64 ने वाढ झालेली असुन 4.86 टक्के नी वाढ झालेली आहे. अभिकरण निधी प्राप्त अनुदानाचे अधिन झालेला खर्च रक्कम रुपये 2224.67 ची तुलना 2015-2016 या वर्षाशी केली असता 175.83 म्हणजे 8.58 टक्के वाढ झालेली आहे. जिल्हा परिषद स्वउत्पन्नाबाबत 1177.24 कोटी झालेला खर्चाची तुलना 2015-2016 या वर्षातील खर्चाशी केली असता 248.93 म्हणजे 17.45 घट झालेली दिसुन येते.

## 1.5 महसुली लेख्यांबाहेरील जमा रकमा

सन 2016-2017 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

**(अ) जमा रकमा :-** महसुली लेख्यांबाहेरील जमा रकमांमध्ये राज्य शासनाकडून(व्याजी किंवा बिनव्याजी)तसेच इतर संस्थाकडुन मिळालेल्या कर्जाच्या, जिल्हा परिषदांनी मंजूर केलेल्या कर्जाच्या वसुलीचा, मंजूर केलेल्या आगाऊ रकमेच्या वसुलीचा आणि घसारा निधी, निवृत्तीवेतन निधी इत्यादी विविध योजनांबाबतच्या व्यवहारासह ठेवीच्या व्यवहाराचा समावेश आहे.

**(ब) कर्जे** :- यापुर्वीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे शासनाव्दारे जिल्हा परिषदांना मंजूर करण्यात येणारे तपशिलवार लेखे महालेखापाल ठेवतात. जिल्हा परिषदांना खालीलप्रमाणे दोन प्रकारचे लेखे ठेवावे लागतात.

(1) शासनाकडून मिळालेली, परत केलेली व परतफेड न केलेली कर्ज व त्यांचे थकबाकी दर्शविणारे लेखे.

(2) जिल्हा परिषदांनी व्यक्तिगत दिलेली कर्जे, त्यांची वसूली व थकबाकी यांचे लेखे, जिल्हा परिषदांनी कर्जाचे लेखे व्यवस्थित व अद्ययावत ठेवण्याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

**(क) ठेवी :-** जिल्हा परिषदांकडे मोठया प्रमाणात ठेवी आहेत. परंतु त्यांचे लेखे ठेवण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. मागील अहवालात नमूद केल्याप्रमाणे पुष्कळदा जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या ठेव नोंदवहया अपूर्ण होत्या. एवढेच नव्हे तर मागील वर्ष अखेरची शिल्लक बिनचुकपणे पूढे ओढण्यात आलेली नव्हती, जमा व प्रदान रकमांच्या नोंदी नोंदवहयामध्ये केलेल्या नव्हत्या. त्यांचा वार्षिक लेख्यांशी मेळ बसत नव्हता. त्याचप्रमाणे ठेवी परत देय होतात, तेव्हापासुन तीन वर्षापेक्षा अधिक काळ अदत्त् असलेलया ठेवी महसुल खाती जमा करण्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 च्या नियम 219 अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही करण्यात आलेली नव्हती.

## 1.6 महसुली लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमा

सन 2016-2017 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

महसुली लेख्यांबाहेरील खर्चात शासनाकडून मिळणाऱ्या कर्जातुन विविध विकास कार्ये आणि योजना याकरिता लाभार्थ्यांना कर्जाचे रुपाने जिल्हा परिषदांनी संवितरित केलेल्या रकमांचा समावेश होतो. या कर्जाच्या लेख्यांकडे सर्वसाधारणपणे दूर्लक्ष केले असल्याचे आढळले वेगवेगळया लाभार्थ्यांना दिलेल्या कर्जाचे लेखे ठेवण्यात आले नव्हते किंवा कर्जाच्या वापरासंबंधी प्रमाणपत्रे विहीत मुदतीत सादर करण्यात आली नव्हती.

तसेच महसुली लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमांमध्ये जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिलेल्या निरनिराळया आगाऊ रकमा व इतर ठेवीबाबतच्या व्यवहारांचा समावेश होतो. वरील परिच्छेद 1.5(क) मध्ये ठेवींच्या व्यवहारासंबंधी व्यक्त केलेले अभिप्राय लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमांबाबतच्या व्यवहारांनाही लागू आहेत.

## 1.7 जिल्हा परिषदांचे वार्षिक लेखे

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 65 प्रमाणे जिल्हा परिषदांनी प्रत्येक वर्षाचे लेखे पुढील वर्षाच्या 30 जुनला बंद केले पाहिजेत व ते स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातर्फे प्रमाणित करुन शासनाकडे सादर करावयास हवेत.

सन 2016-2017 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

(**अ**) **सन 2016-2017 च्या लेख्यांबाबत :-** महाराष्ट्रातील एकूण 34 जिल्हा परिषदांपैकी 10 जिल्हा परिषदांनी (रायगड, अमरावती, अकोला, औरंगाबाद, बीड, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, धुळे व जळगाव) सन 2016-2017 चे वार्षिक लेखे पुर्ण करुन 15 ऑक्टोबर 2017 पर्यंत स्थानिक निधी विभागाकडे प्रमाणित करण्यासाठी सादर केले नाहीत. लेखे प्रमाणित करण्याअगोदर तपासले असता ते त्रुटींच्या पुर्ततेसाठी 05 जिल्हा परिषदांकडे (वाशिम, बुलढाणा, जालना, परभणी, गडचिरोली) परत पाठवावे लागले. जिल्हा परिषदांनी त्रुटी पुर्तता न केल्यामुळे 15 नोव्हेंबर 2017 पर्यंत वार्षिक लेखे शासनाकडे प्रमाणित करुन घेण्यासाठी सादर करण्यात आले नाहीत.

वार्षिक लेखे प्रमाणित करताना त्यामध्ये फार मोठया प्रमाणात त्रुटी आढळतात व त्यांची पुर्तता करणेसाठी पुन्हा संबंधित जिल्हा परिषदेकडे परत पाठवावे लागतात. जिल्हा परिषदांनी वार्षिक लेखे पुर्तता करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन लेख्यांचे प्रमाणिकरण विनाविलंब होऊ शकेल.

(**ब**) **वार्षिक लेख्यांची प्रसिध्दी:-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम 136 अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 66(ए-9) प्रमाणे जिल्हा परिषदांना त्यांचे मागील वर्षाचे लेखे चालू वर्षाच्या 15 नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावयास हवेत. तेव्हा वार्षिक लेखे शासकीय राजपत्रात वेळेवर प्रसिध्द करण्याच्याबाबतीत जिल्हा परिषदांनी विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

## 1.8 घसारा निधी

सन 2016-2017 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 239,241 व 242 मधील तरतुदी शिथील करुन जिल्हा परिषदांनी घसारा निधी ठेवणे ही बाब शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए1072/43764/सीआर-27/अ-30, दिनांक 9 सप्टेंबर, 1980 प्रमाणे ऐच्छिक करण्यात आली होती.

ग्रामविकास विभाग परिपत्रक, क्र.झेडपीए-1088/सीआर-2902/28, दिनांक 30 मार्च, 1988 च्या आदेशान्वये दिनांक 9 सप्टेंबर 1980 चे आदेश रद्दबातल करुन शासनाच्या क्रमांक झेडपीए-1080/4769/सीआर-1459/28, दिनांक 1 जानेवारी 1988 च्या अधिसुचनेच्या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील तरतुदीनुसार घसारा निधी ठेवणे ही बाब अनिवार्य ठरविण्यात आली यासाठी शासनाने घसारा निधी नियमीत करण्यासाठी क्रमांक झेडपीए-1076/4764/तीस, दिनांक 24 सप्टेंबर,1976 अन्वये पाठविलेल्या नमुना नियमावलीस अधीन राहून नवीन नियमावली तयार करुन शासन मान्यतासाठी पाठविण्याबाबत जिल्हा परिषदांना सूचना दिल्या होत्या, या संदर्भात शासनाने मागविलेल्या माहितीनुसार 34 जिल्हा परिषदांनी तयार केलेल्या नियमावलीस शासनाने मान्यता दिली आहे.

(ब) सन 2016-2017 चे लेखापरीक्षणाचे वेळी बहुतांश जिल्हा परिषदांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 मधील नियम 241 मध्ये विहीत केलेल्या टक्केवारीपर्यंत घसारा निधीत अंशदान न करता तदर्थ तत्वावर केल्याचे आढळुन आले.

(क) जिल्हा परिषदेच्या स्तरावर विहीत केलेल्या नियमावलीनुसार घसारा निधीबाबत माहिती उपलब्ध नसल्याने दिनांक 1 एप्रिल ते 31 मार्च 2017 पर्यंत नियमाप्रमाणे जिल्हा परिषदच्या घसारा निधीत किती रक्कम जमा व्हावयाला पाहिजे होती, त्याची निश्चिती करता आली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या निधीकडे नेमकी किती रक्कम येत आहे व ती प्रत्येक वर्षी किती राहणार आहे, याचा उलगडा झाला नाही.

## 1.9 प्राथमिक शिक्षण वर्गणी

मुंबई शिक्षण अधिनियम 1947 च्या 42 व्या कलमानुसार व त्यातील नियम क्रमांक 142 मधील तरतुदीप्रमाणे विविध प्राधिकृत नगरपालिकांकडून देय असलेली प्राथमिक शिक्षण वर्गणी जिल्हा परिषदा वेळच्यावेळी वसुल करीत नसल्याचे खालील तपशिलावरुन स्पष्ट होते.

**(अमरावती, नागपुर व औरंगाबाद विभाग वगळून)**

**(रुपये लाखात)**

| 1एप्रिल 2016 पर्यंत थकित असलेली वर्गणी | 2016-2017 मध्ये येणे असलेली वर्गणी | एकूण | 2016-2017मध्ये वसुल केलेली वर्गणी | 31 मार्च 2017 रोजी थकित असलेली वर्गणी |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 3013.81 | 290.04 | 3303.85 | 1532.32 | 1771.53 |

**(जिल्हावार माहितीसाठी कृपया परिशिष्ट 'ब' पहावे)**

वरीलप्रमाणे शिल्लक असलेल्या थकबाकीच्या सव्याज वसुलीकरिता उपरीनिर्दिष्ट नियमावलीचे नियम क्रमांक 143 मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि अशा प्रकारे माहिती तथा थकबाकीकरिता नोटीसा देण्यात आलेल्या नाहीत. अशा हद्दीतील प्राथमिक शिक्षणाचा भार पर्यायाने शासकीय निधीवर पडला आहे.

प्राथमिक शिक्षण वर्गणीबाबत वरील माहिती पाहता येणे असलेली प्राथमिक शिक्षण वर्गणीची रक्कम फार मोठया प्रमाणात थकीत आहे. शासनाच्या नगरविकास विभागाच्या आदेश क्रमांक जीनटी-1075/1782/युडी-10, दिनांक 1 डिसेंबर 1976 अन्वये संबंधित जिल्हाधिकारी यांनी नगरपालिकांकडून प्राथमिक शिक्षणाच्या वर्गणीची रक्कम नगरपरिषदांच्या देय अनुदानातुन वसुल करुन ती संबंधित जिल्हा परिषदेला अदा करावयाची आहे परंतु शासनाच्या वरील निर्णयाप्रमाणे कार्यवाही होत नसल्यास वरील थकबाकीच्या आकडेवारीवरुन दिसुन येईल. थकित वर्गणी त्वरेने वसुल करण्याबाबत कारवाई करणे आवश्यक आहे.

## 1.10 समायोजित व्हावयाच्या अग्रिम व अनामत (ठेव) रकमा

(अ) **अग्रिम रकमा :-** जिल्हा परिषदेमध्ये कर्मचा-यांना व संबंधित खात्याच्या अधिका-यांना वेगवेगळया कारणांसाठी दिलेल्या आगाऊ रकमांचे दिनांक 31 मार्च 2017 पर्यंत ब-याच प्रमाणात समायोजन झालेले नव्हते. दिनांक 31 मार्च 2017 ला जिल्हा परिषदेच्या लेख्यांमध्ये शिल्लक असलेल्या आगाऊ रकमांचा वर्षवार तपशील खालीलप्रमाणे आहे.

सदर माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आलेली आहे.

(रुपये लाखात)

| वर्ष | एकूण |
|---|---|
| 1962-63 पुर्वीचे ते 2012-2013 | 3456.97 |
| 2013-2014 | 402.37 |
| 2014-2015 | 494.03 |
| 2015-2016 | 699.25 |
| 2016-2017 | 909.88 |
| एकूण | **6001.28** |

(**ब**) **अनामत (ठेव) रकमा**:- दिनांक 31 मार्च, 2017 रोजी जिल्हा परिषदांच्या लेख्यांमध्ये असलेल्या अनामत (ठेव) रकमांचा वर्षवार तपशील खालीलप्रमाणे आहे. सदरची माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीनुसार आहे.

(**रुपये लाखात**)

| **वर्ष** | **प्रलंबित अनामत (ठेव)** |
|---|---:|
| 1962-63 पुर्वीचे ते 2012-2013 | 12029.76 |
| 2013-2014 | 5702.33 |
| 2014-2015 | 9165.70 |
| 2015-2016 | 16844.81 |
| 2016-2017 | 25305.63 |
| **एकूण** | **69048.23** |

## 1.11 जिल्हा परिषदांकडील मत्ता व दायित्वे

महाराष्ट्र राज्यातील 34 जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्हा परिषदनिहाय दिनांक 31 मार्च, 2017 रोजीचा मत्ता व दायित्वाचा तक्ता सोबत जोडला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमए एस-2013/प्र.क्र14/वित्त-6 मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 5/10/2013 अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी विहीत केलेल्या मॉडेल अकाऊन्टींग सिस्टिमच्या नमुना क्र 1 ते 8 मध्ये मासिक/वार्षिक लेखे ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापी जिल्हा परिषदांकडून नमुना नंबर 1 व 2 मध्येच सद्यस्थितीमध्ये लेखे ठेवण्यात आलेले असल्याचे दिसून येते. मॉडेल अकाऊन्टींग सिस्टिमच्या नमुना नंबर 4 येणे देणे नोंदवही, नमुना नंबर 5 स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना नंबर 6 जंगम मालमत्ता नोंदवहया परिपुर्ण नसल्यामुळे जिल्हा परिषदांनी तयार केलेल्या मत्ता व दायित्व तक्त्यातील आकडेवारीची सत्यता उपलब्ध अभिलेख्यांवरुन पडताळून पाहता आली नाही. सदर तक्त्यामध्ये स्थिरत्वाच्या बाबी (Fix Assets)(उदाहरणार्थ इमारती, रस्ते इत्यादी) नमूद केलेल्या नसुन फक्त रोकडसुलभ मत्तांच्या बाबी (Current Assets) नमुद केलेल्या आहेत. तक्त्यावरुन जिल्हा परिषदांकडे एकूण दायित्व रुपये 1584635.87 लाख व एकूण मत्ता रुपये 3840000.14 लाख असल्याचे दिसते.

तसेच सोबतच्या तक्त्यात जिल्हा परिषदांनी दिलेल्या माहितीच्या आधारे जिल्हा परिषदांनी शासनाकडे भरावयाच्या रकमा व जिल्हा परिषदांना शासनाकडून येणे असलेल्या रकमा दाखविल्या आहेत. यावरुन जिल्हा परिषदांनी शासनाकडे भरावयाच्या एकूण रकमा रुपये 1,55,130.37 लाख इतक्या आहेत. तसेच जिल्हा परिषदांना शासनाकडून येणे असलेली रक्कम रुपये 1,92,943.18 लाख इतकी आहे. पैकी जिल्हा परिषद उत्पन्न रुपये 75,257.87 लाख व शासकीय अनुदान रुपाने मिळणारे उत्पन्न रुपये 1,17,685.31 लाख इतके आहे. याचा तपशिल सोबत जोडलेला आहे. एकूण दायित्वापैकी रुपये 32,998.45 लाख जिल्हा परिषदांकडून इतर संस्थांना अनुदानापोटी देय आहेत. सदर रकमांचा तक्ता सोबत जोडला आहे. सन 2015-2016 मध्ये शासनाकडून जिल्हा परिषदांना मिळावयाच्या अनुदानापैकी बाकी रक्कम रुपये 61236.44 कोटी होती. सन 2016-2017 अखेर शासनाकडुन जिल्हा परिषदांना मिळावयाची अनुदानाची बाकी रक्कम रुपये 75,257.87 कोटी येणे आहे.

**टिप** :- **परिच्छेद क्रमांक 1.1 ते 1.11 करीता,**

**1) बीड जिल्हा परिषदेची माहिती अप्राप्त आहे.**

**2) सदर माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आली आहे.**

## दिनांक 31 मार्च 2017 अखेर मत्ता व दायित्वाचे विवरण

**दायित्वे** **(एकूण रुपये लाखात)**

| अ.क्र. | जि.प.चे नांव | | | कर्जे व आगाऊ रकमा | | | | अदत्त् देयके | जि प.चे देणेकरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ठेवी | | शासकिय कर्जे | | इतर कर्जे | | | |
| | | जि.प | पं.स. | अखर्चित | देय हप्ते | अखर्चित | देय हप्ते | | |
| 1 | ठाणे | 1496.01 | 166.03 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | पालघर | 887.88 | 128.15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | रायगड | 12396.32 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | रत्नागिरी | 473.48 | 0 | 0 | 342.04 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | सिंधुदुर्ग | 1307.25 | 190.16 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | | | | |
| 7 | धुळे | 1016 | 378 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | नंदूरबार | 2376.11 | 146.64 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | जळगाव | 360.35 | 0 | 0 | 0 | 104.6 | 0 | 0 | 0 |
| 10 | अहमदनगर | 707.83 | 1498.37 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | पुणे | 8087.41 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | सातारा | 2668.01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | सांगली | 1196.25 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | कोल्हापुर | 3424.43 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 15 | सोलापुर | 1753.48 | 823.53 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | अमरावती | 1547.08 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 17 | अकोला | 546.27 | 156.41 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7221.71 |
| 18 | वाशिम | 264.03 | 89.51 | | | | | 0 | 6186.23 |
| 19 | यवतमाळ | 215.7 | 70.83 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 20 | बुलढाणा | 2423.58 | 381 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | नागपुर | 657762.29 | 0 | 505000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 22 | वर्धा | 1510.87 | 85.29 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | भंडारा | 2942.3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | गोंदिया | 264.57 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | चंद्रपुर | 3486.76 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | गडचिरोली | 1098.14 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 27 | औरंगाबाद | 1510.81 | 1015.82 | 12.41 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 28 | जालना | 1465.5 | 0 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 0 |
| 29 | बीड | माहिती अप्राप्त | | | | | | | |
| 30 | परभणी | 468.1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 31 | हिंगोली | 491 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 32 | नांदेड | 1155.51 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 0 |
| 33 | उस्मानाबाद | 1651.12 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 34 | लातुर | 939.74 | 0 | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0 |
| | **एकूण** | **717894.18** | **5129.74** | **505012.41** | **342.04** | **114.60** | **0** | **0** | **13407.94** |

**(एकुण रुपये लाखात)**

| अ.क्र. | जि.प.चे नांव | जि.प.कडून पं.स.व ग्रा.पं.ला देय अनुदान | शासनाकडे भरणा करावयाची रक्कम | विशेष निधी | एकूण दायित्वे | मत्तेचे दायित्वावर अधिक्य | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे | 252.03 | 3130.13 | 0 | 5044.2 | 12447.16 | 17491.36 |
| 2 | पालघर | 1221.05 | 5120.09 | 0 | 7357.17 | 35387.2 | 42744.37 |
| 3 | रायगड | 5400 | 0 | 2514.83 | 20311.15 | 0 | 20311.15 |
| 4 | रत्नागिरी | 634.05 | 3970.43 | 6935.79 | 12355.79 | 2836.64 | 15192.43 |
| 5 | सिंधुदुर्ग | 0 | 2785.73 | 0 | 4283.14 | 12219.97 | 16503.11 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | | |
| 7 | धुळे | 454 | 22076 | 1747 | 25671 | 138 | 25809 |
| 8 | नंदूरबार | 0 | 0 | 0 | 2522.75 | 25883.03 | 28405.78 |
| 9 | जळगाव | 385.49 | 3253.69 | 2778.26 | 6882.39 | 49718.13 | 56600.52 |
| 10 | अहमदनगर | 865.28 | 6179.23 | 0 | 9250.71 | 35570.8 | 44821.51 |
| 11 | पुणे | 16867.9 | 3648.1 | 1894.55 | 30497.96 | 21492.79 | 51990.75 |
| 12 | सातारा | 208.45 | 16222.67 | 2187.42 | 21286.55 | 21061.52 | 42348.07 |
| 13 | सांगली | 1221.34 | 0 | 0 | 2417.59 | 11293.63 | 13711.22 |
| 14 | कोल्हापुर | 2.69 | 19330.08 | 250.81 | 23008.01 | 4619.37 | 27627.38 |
| 15 | सोलापुर | 0 | 2499.3 | 0 | 5076.32 | 31129.85 | 36206.17 |
| 16 | अमरावती | 2150.25 | 0.0 | 97205.18 | 100902.51 | 49302.54 | 150205.05 |
| 17 | अकोला | 554.92 | 7500.42 | 0 | 15979.73 | 17698.42 | 33678.15 |
| 18 | वाशिम | 0 | 0 | 0 | 6539.77 | 20134.51 | 26674.28 |
| 19 | यवतमाळ | 1239.67 | 5817.05 | 59.48 | 7402.73 | 49784.09 | 57186.82 |
| 20 | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 2804.58 | 10687.53 | 13492.11 |
| 21 | नागपुर | 0 | 0 | 0 | 1162762.29 | 1695971.95 | 2858734.24 |
| 22 | वर्धा | 0 | 890.47 | 0 | 2486.63 | 16768.83 | 19255.46 |
| 23 | भंडारा | 0 | 9493.68 | 227.95 | 12663.93 | 4873.84 | 17537.77 |
| 24 | गोंदिया | 0 | 2385.89 | 0 | 2650.46 | 4669.72 | 7320.18 |
| 25 | चंद्रपुर | 0 | 1682.05 | 0 | 5168.81 | 9080.42 | 14249.23 |
| 26 | गडचिरोली | 0 | 3063.85 | 12.14 | 4174.13 | 24757.31 | 28931.44 |
| 27 | औरंगाबाद | 0 | 71.08 | 0 | 2610.12 | 35709.25 | 38319.37 |
| 28 | जालना | 976.01 | 1642.81 | 35 | 4129.32 | 18120.93 | 22250.25 |
| 29 | बीड | माहिती अप्राप्त | | | | | |
| 30 | परभणी | 190.91 | 3283.75 | 38681.79 | 42624.55 | -2823.43 | 39801.12 |
| 31 | हिंगोली | 0 | 3254.4 | 0 | 3745.4 | 14015.59 | 17760.99 |
| 32 | नांदेड | 188.48 | 5052.95 | 0 | 6396.94 | 4049.62 | 10446.56 |
| 33 | उस्मानाबाद | 185.93 | 20812.65 | 75.94 | 22725.64 | 3347.5 | 26073.14 |
| 34 | लातुर | 0 | 1963.86 | 0 | 2903.6 | 15417.56 | 18321.16 |
| | **एकुण बेरीज** | **32998.45** | **155130.37** | **154606.14** | **1584635.87** | **2255364.27** | **3840000.14** |

**दिनांक 31 मार्च 2017 अखेरची स्थिती**

**मत्ता** **(एकुण रुपये लाखात)**

| अ.क्र. | जि.प.चे नांव | जिल्हा निधीची रक्कम | | जि.प.चे घेणेकरी | वसुलीयोग्य मागण्या | कर्जे | अग्रिम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रोख | गुंतवणूक | | | | |
| 1 | ठाणे | 11910.63 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | पालघर | 30874.74 | 8765 | 0 | 0 | 0 | 63.95 |
| 3 | रायगड | 8894.62 | 0 | 0 | 100 | 117.23 | 48.94 |
| 4 | रत्नागिरी | 9660.33 | 0 | 0 | 278.73 | 589.07 | 28.71 |
| 5 | सिंधुदुर्ग | 4978.68 | 9930.14 | 0 | 0 | 0.43 | 111.68 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | | |
| 7 | धुळे | 23348 | 0 | 0 | 453 | 0 | 260 |
| 8 | नंदूरबार | 18981.64 | 7600 | 0 | 0 | 0 | 67.68 |
| 9 | जळगाव | 36216.57 | 17274.47 | 0 | 1693.11 | 0 | 182.56 |
| 10 | अहमदनगर | 35394.24 | 4054.22 | 0 | 0 | 0 | 176.23 |
| 11 | पुणे | 13754.87 | 0.3 | 0 | 643.9 | 0 | 193.46 |
| 12 | सातारा | 30604.03 | 5149.5 | 0 | 33.87 | 5.62 | 42.87 |
| 13 | सांगली | 5258.27 | 4990 | 0 | 23.82 | 0 | 94.77 |
| 14 | कोल्हापुर | 9922.83 | 10805 | 0 | 0 | 1.98 | 20.2 |
| 15 | सोलापुर | 14808.25 | 19292.48 | 0 | 0 | 0 | 104.9 |
| 16 | अमरावती | 22351.69 | 20000 | 0 | 34.04 | 0 | 0 |
| 17 | अकोला | 30701.41 | 0.05 | 0 | 1700.19 | 198.8 | 172.41 |
| 18 | वाशिम | 10374.28 | 16300 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | यवतमाळ | 45093.31 | 8730.76 | 0 | 1493.33 | 0 | 432.67 |
| 20 | बुलढाणा | 11073.07 | 2358.83 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | नागपुर | 2849479.11 | 0 | 0 | 0 | 0 | 9255.13 |
| 22 | वर्धा | 17639.9 | 0 | 0 | 14.21 | 0 | 30.82 |
| 23 | भंडारा | 15760.96 | 1751.96 | 0 | 0 | 0 | 18.96 |
| 24 | गोंदिया | 6961.39 | 0 | 0 | 2.81 | 0 | 0 |
| 25 | चंद्रपुर | 5919.41 | 6317.92 | 0 | 0 | 0 | 196.86 |
| 26 | गडचिरोली | 24820.85 | 0 | 0 | 171.13 | 0 | 118.96 |
| 27 | औरंगाबाद | 13323.71 | 24000.03 | 0 | 0 | 0 | 87.07 |
| 28 | जालना | 18722.33 | 0 | 0 | 0 | 0 | 146.13 |
| 29 | बीड | माहिती अप्राप्त | | | | | |
| 30 | परभणी | 39240.28 | 0 | 0 | 0 | 5.5 | 70.64 |
| 31 | हिंगोली | 8972.9 | 3987.01 | 0 | 0 | 0 | 46.96 |
| 32 | नांदेड | 10031.04 | 0 | | 0.57 | 0 | 313.85 |
| 33 | उस्मानाबाद | 24919.76 | 0 | 0 | 730.72 | 1.92 | 6.78 |
| 34 | लातुर | 16893.36 | 0 | 0 | 345.14 | 0 | 50.45 |
| | **एकुण बेरीज** | **3426886.46** | **171307.67** | **0** | **7718.57** | **920.55** | **12343.64** |

(एकूण रुपये लाखात)

| अ.क्र. | जि.प.चे नांव | शासनाकडून मिळावयाची अनुदाने | | विशेष निधीची शिल्लक | | एकूण मत्ता | दायित्वाचे मत्तेवर अधिक्य | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जि.प.उत्पन्न | शासकिय योजना | रोख | गुंतवणूक | | | |
| 1 | ठाणे | 3721.9 | 0 | 0 | 1858.83 | 17491.36 | 0 | 17491.36 |
| 2 | पालघर | 1602.47 | 0 | 0 | 1438.21 | 42744.37 | 0 | 42744.37 |
| 3 | रायगड | 10907.17 | 0 | 243.19 | 0 | 20311.15 | 0 | 20311.15 |
| 4 | रत्नागिरी | 1310.22 | 724.67 | 0 | 2600.7 | 15192.43 | 0 | 15192.43 |
| 5 | सिंधुदुर्ग | 1200.82 | 0 | 0 | 281.36 | 16503.11 | 0 | 16503.11 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | | | |
| 7 | धुळे | 1 | 0 | 0 | 1747 | 25809 | 0 | 25809 |
| 8 | नंदूरबार | 0 | 0 | 0 | 1756.46 | 28405.78 | 0 | 28405.78 |
| 9 | जळगाव | 702.77 | 0 | 0 | 531.04 | 56600.52 | 0 | 56600.52 |
| 10 | अहमदनगर | 2816.13 | 1122.36 | 0 | 1258.33 | 44821.51 | 0 | 44821.51 |
| 11 | पुणे | 35432.27 | 71.4 | 0 | 1894.55 | 51990.75 | 0 | 51990.75 |
| 12 | सातारा | 3769.18 | 555.58 | 338.82 | 1848.6 | 42348.07 | 0 | 42348.07 |
| 13 | सांगली | 2815.2 | 108.99 | 0 | 420.17 | 13711.22 | 0 | 13711.22 |
| 14 | कोल्हापुर | 601.06 | 6276.31 | 0 | 0 | 27627.38 | 0 | 27627.38 |
| 15 | सोलापुर | 1086.75 | 89.85 | 0 | 823.94 | 36206.17 | 0 | 36206.17 |
| 16 | अमरावती | 1665.29 | 105308.03 | 187.33 | 658.67 | 150205.05 | 0 | 150205.05 |
| 17 | अकोला | 265.09 | 0 | 0 | 640.2 | 33678.15 | 0 | 33678.15 |
| 18 | वाशिम | 0 | 0 | 0 | 0 | 26674.28 | 0 | 26674.28 |
| 19 | यवतमाळ | 1414.75 | 0 | 0 | 22 | 57186.82 | 0 | 57186.82 |
| 20 | बुलढाणा | 0 | 0 | 60.21 | 0 | 13492.11 | 0 | 13492.11 |
| 21 | नागपुर | 0 | 0 | 0 | 0 | 2858734.24 | 0 | 2858734.24 |
| 22 | वर्धा | 1228.26 | 0 | 342.27 | 0 | 19255.46 | 0 | 19255.46 |
| 23 | भंडारा | 0 | 5.89 | 0 | 0 | 17537.77 | 0 | 17537.77 |
| 24 | गोंदिया | 320.28 | 6.65 | 29.05 | 0 | 7320.18 | 0 | 7320.18 |
| 25 | चंद्रपुर | 1423.43 | 0 | 0 | 391.61 | 14249.23 | 0 | 14249.23 |
| 26 | गडचिरोली | 0 | 0 | 0 | 3820.5 | 28931.44 | 0 | 28931.44 |
| 27 | औरंगाबाद | 44.37 | 0 | 0 | 864.19 | 38319.37 | 0 | 38319.37 |
| 28 | जालना | 31.4 | 3350.39 | 0 | 0 | 22250.25 | 0 | 22250.25 |
| 29 | बीड | माहिती अप्राप्त | | | | | | |
| 30 | परभणी | 427.12 | 0 | 0 | 57.58 | 39801.12 | 0 | 39801.12 |
| 31 | हिंगोली | 1682.3 | 0 | 0 | 3071.82 | 17760.99 | 0 | 17760.99 |
| 32 | नांदेड | 0 | 0 | 101.1 | 0 | 10446.56 | 0 | 10446.56 |
| 33 | उस्मानाबाद | 287.83 | 50.19 | 0 | 75.94 | 26073.14 | 0 | 26073.14 |
| 34 | लातुर | 500.81 | 15 | 0 | 516.4 | 18321.16 | 0 | 18321.16 |
| | **एकुण बेरीज** | **75257.87** | **117685.31** | **1301.97** | **26578.1** | **3840000.14** | **0** | **3840000.14** |

**दिनांक 31 मार्च 2017 अखेर शासनाकडे भरणा करावयाच्या रक्कमा**

**दायित्वे** **(एकूण रुपये लाखात)**

| अ.क्र. | जि.प.चे नांव | मंजुर अनुदानाच्या पेक्षा जास्त अर्थोपाय रक्कम | वर्ष अखेर शिल्लक राहिलेले अखर्चित अनुदान | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सप्रयोजन | योजनांतर्गत | आस्थापना | इतर(एकुण) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | ठाणे | 0 | 0 | 3130.13 | 0 | 0 |
| 2 | पालघर | 0 | 2107.42 | 879.67 | 2133 | 0 |
| 3 | रायगड | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | रत्नागिरी | 0 | 467.43 | 2245.3 | 40.84 | 0 |
| 5 | सिंधुदुर्ग | 0 | 0 | 2160.42 | 625.31 | 0 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | |
| 7 | धुळे | 0 | 6832 | 8046 | 205 | 3090 |
| 8 | नंदूरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | जळगाव | 0 | 0 | 0 | 3253.69 | 0 |
| 10 | अहमदनगर | 0 | 0 | 2618.52 | 2438.35 | 0 |
| 11 | पुणे | 0 | 0 | 0 | 0 | 3648.1 |
| 12 | सातारा | 1945 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | सांगली | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | कोल्हापुर | 0 | 0 | 0 | 0 | 18811.89 |
| 15 | सोलापुर | 0 | 0 | 0 | 0 | 2499.31 |
| 16 | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 17 | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 7500.42 |
| 18 | वाशिम | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | यवतमाळ | 0 | 1545.96 | 2417.16 | 546.98 | 0 |
| 20 | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | नागपुर | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 22 | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 890.47 |
| 23 | भंडारा | 0 | 0 | 8651.22 | 0 | 0 |
| 24 | गोंदिया | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | चंद्रपुर | 0 | 0 | 671.64 | 1010.41 | 0 |
| 26 | गडचिरोली | 0 | 3063.85 | 0 | 0 | 0 |
| 27 | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 28 | जालना | 0 | 0 | 354.4 | 557.41 | 0 |
| 29 | बीड | माहिती अप्राप्त | | | | |
| 30 | परभणी | 0 | 0 | 1742.09 | 1541.66 | 0 |
| 31 | हिंगोली | 0 | 1690.61 | 968.97 | 594.82 | 0 |
| 32 | नांदेड | 0 | 0 | 0 | 0 | 5052.95 |
| 33 | उस्मानाबाद | 0 | 10041.17 | 0 | 0 | 36.62 |
| 34 | लातुर | 1578.47 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **एकुण बेरीज** | **3523.47** | **25748.44** | **33885.52** | **12947.47** | **41529.76** |

(एकूण रुपये लाखात)

| अ.क्र. | जि.प.चे नांव | अनुदान निर्धारणाने नामंजुर केलेले अनुदान | शासकिय हस्तांतरण योजनांपासुन जि.प.कडे जमा उत्पन्न | न.पा.कडून वसुल केलेली प्रा.शि.वर्गणी | निवृत्ती वेतन वर्गणी | शासनाकडे भरावयाची इतर व्यपगत रक्कम | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | ठाणे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3130.13 |
| 2 | पालघर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5120.09 |
| 3 | रायगड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | रत्नागिरी | 0 | 23.49 | 724.67 | 30.99 | 437.71 | 3970.43 |
| 5 | सिंधुदुर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2785.73 |
| 6 | नाशिक | माहिती अप्राप्त | | | | | |
| 7 | धुळे | 2397 | 1506 | 0 | 0 | 0 | 22076 |
| 8 | नंदूरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3253.69 |
| 10 | अहमदनगर | 0 | 0 | 1122.36 | 0 | 0 | 6179.23 |
| 11 | पुणे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3648.1 |
| 12 | सातारा | 0 | 0 | 0 | 0 | 14277.67 | 16222.67 |
| 13 | सांगली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | कोल्हापुर | 0 | 517.62 | 0 | | 0.57 | 19330.08 |
| 15 | सोलापुर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2499.3 |
| 16 | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.0 |
| 17 | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7500.42 |
| 18 | वाशिम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 1306.95 | 5817.05 |
| 20 | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | नागपुर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 22 | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 890.47 |
| 23 | भंडारा | 0 | 842.46 | 0 | 0 | 0 | 9493.68 |
| 24 | गोंदिया | 2385.89 | 0 | 0 | 0 | 0 | 2385.89 |
| 25 | चंद्रपुर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1682.05 |
